संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# आता बीएसएनएलचा गळा घोटणार

**कोणताच** सरकारी उपक्रम किंवा सरकारी कंपनी चालू द्यायची नाही. असा सरकारचाच उद्देश दिसून येतो. एअर इंडिया साठ हजार कोटीचा तोटा, एमटीएनएल पंचवीस हजार कोटीचा तोटा, आता बीएसएनएल एकतीस हजार कोटीचा तोटा अशा केंद्र सरकारच्या मालकीच्या कंपन्या एकापाठोपाठ तोट्यात दाखवून बंद करण्याचा घाट घातला जात असल्याचे दिसून येते. गेल्या वर्षभरापासून एमटीएनएल म्हणजेच महानगर टेलिफोन निगम लिमिटेडमध्ये कर्मचाऱ्यांसाठी स्वेच्छा निवृत्तीची योजना जाहीर गेली. कंपनी तोट्यात असल्याचे सांगितले गेले आणि आता बीएसएनएल म्हणजे भारत संचार निगम लिमिटेड या कंपनीनेसुध्दा कर्मचाऱ्यांवर स्वेच्छा निवृत्तीसाठी दबाव टाकला जात आहे. जवळपास ६७ हजार कर्मचाऱ्यांना आपल्या नोकरीवर पाणी सोडण्याची वेळ येईल. परंतु एकीकडे कर्मचाऱ्यांना हा पर्याय दिला जात असतानाच भारत संचारची देशभर जी काही मालमत्ता आहे. त्यातली जवळपास पन्नास टक्के मालमत्ता विकायला काढण्याचा दूरसंचार खात्याने निर्णयसुध्दा घेतला आहे. याचा अर्थ तोट्याचे कारण सांगायचे कर्मचाऱ्यांची संख्या कमी करायची आणि मग अतिरिक्त असलेली ही मालमत्ता कवडीमोल किंमतीने खाजगी लोकांच्या घशात घालायची असा सगळा बेबनाव दिसून येतो. या संदर्भात दूरसंचार खात्याकडून जी काही आकडेवारी पुढे केली जात आहे. तीसुध्दा विश्वासार्ह वाटू नये. इतका त्यामध्ये फरक दिसून येतो. संपूर्ण देशातील बीएसएनएलच्या मालमत्तांची किंमत फक्त पंधरा हजार कोटी दाखवली गेली आहे. परंतु बहुमजली इमारती आणि अनेक मोकळ्या जागा यांचा विचार केला तर ही रक्कम निश्चितच पन्नास हजारकोटीच्यावर जाऊ शकते. याचाच अर्थ जाणीवपूर्वक सुरुवातीलाच मालमत्तांची ही किंमत कमी दाखवून मर्जीतल्या भांडवलदारांचा किंवा बिल्डरांचा फायदा करून देण्याची चाल त्यातून दिसून येते. अगदी दोन वर्षापूर्वीपर्यंत फायद्यात असणारी बीएसएनएल आता अचानक तोट्यात कशी गेली आणि इतका प्रचंड तोटा होत असताना दूरसंचार खाते काय करत होते. मोदी सरकारच्या कार्यक्षमतेची वकिली करणारे दूरसंचार मंत्री रविशंकर प्रसाद यांच्या खात्याची ही इतकी अधोगती कशी झाली. हादेखील संशोधनाचाच विषय ठरतो.

## खाजगी कंपन्यांना मलई

यापूर्वी अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना प्रमोद महाजन यांच्याकडे दूरसंचार खाते होते त्या काळातसुध्दा स्वतंत्र कारभार पाहाणाऱ्या विदेश संचार निगमला टाळे ठोकले गेले. सरकारी कंपन्यांच्या निर्गुंतवणुकीकरणाचा प्रस्ताव मांडून अनेक सरकारी कंपन्या लिलावात काढल्या गेल्या. त्यातल्या त्यात सर्वाधिक मालमत्ता असलेली विदेश संचार निगम या कंपनीच्या विक्रीतून सर्वाधिक रक्कम केंद्राला मिळाली होती. त्यावेळी ही विदेश संचार निगमची मालमत्ता आपल्या खिशात पडावी म्हणून टाटा समुहाने जोरदार प्रयत्न चालवले होते. तर अंबानी कंपनीनेही त्यात रस दाखवला होता. शेवटी निविदा प्रक्रियेत टाटा कंपनीलाच ती मिळाली. मुंबईतली कितीतरी मोठी मालमत्ता फारशी मोठी किंमत न मोजता टाटा कंपनीला मिळाली हे त्यातले वास्तव आहे. त्याच उपक्रमाचा एक भाग असलेली भारत संचार निगम ही कंपनीदेखील आता आपला गाशा गुंडाळण्याच्या तयारीत आहे. खरे तर त्या क्षेत्रातल्या खाजगी कंपन्या धडाक्यात नफा कमवत असताना सरकारी कंपन्या तोट्यात का जाव्यात असा प्रश्न निर्माण होतो. खाजगी कंपन्यांमध्ये अधिक व्यावसायिक काटेकोरपणा असतो ही गोष्ट खरी आहे. परंतु सरकारच्या काही कंपन्या फायद्यात चालततातच. विशेषतः ज्यांना नवरत्न म्हटले जाते अशा सगळ्या नऊ तेल कंपन्या फायद्यात असल्याचे केंद्र सरकार मोठ्या अभिमानाने सांगत असते. भारतीय आयुर्विम्यासारखा उपक्रम प्रचंड नफा कमावताना दिसतो. अशावेळी दूरसंचार खात्यातल्या कंपन्यांना नफा का कमावता येऊ नये. हे एक मोठे गूढ ठरते. परंतु याचा सरळसरळ दुसरा अर्थ असा होतो की, या क्षेत्रात ज्या खाजगी कंपन्या जोरदार व्यवसाय करतात त्यांच्या व्यवसायात सरकारी कंपनीची आडकाठी येऊ नये. म्हणजेच त्यांना नफा कमावण्यासाठी मोकळे रान मिळाले असाच राजकीय उद्देश असू शकतो. कारण एमटीएनएलतर्फे वाजपेयी यांच्याच कारकिर्दीत डॉल्फिन नावाचा स्वस्तातला मोबाईल ग्राहकांना उपलब्ध करून दिला होता परंतु त्यानंतर बाजारात रिलायन्सचा मोबाईल आल्यानंतर डॉल्फिनला जाणीवपूर्वक दाबून टाकले गेले. हीदेखील वस्तुस्थिती लोक विसरलेले नाहीत.

## त्यांचा घोटाळा यांचा टाळा

सरकारी कंपन्या जेव्हा अचानकपणे बंद पडू लागतात त्यावेळी दाखवला जाणारा तोटा हे केवळ निमित्त असते. खाजगी कंपन्यांशी राजकीय हितसंबंध असल्यामुळे सरकारी कंपन्यांचे अशा पध्दतीने गळे आवळले जातात. आता त्या कटकारस्थानातला बीएसएनएल हा पुढचा बळी आहे. एकीकडे एअरइंडियासारख्या कंपनीला साठ हजार कोटीचा तोटा होत असताना कॉंग्रेसच्या कार्यकाळात हवाई वाहतुक मंत्री प्रफुल्ल पटेल यांनी एकलाख कोटींचे कर्ज घेऊन नवीन साठ विमानांची खरेदी करण्याचा तुघलकी निर्णय घेतला होता. म्हणजे या सरकारी कंपन्या तोट्यात का चालतात याची सगळी कारणे राजकारण्यांच्या हितसंबंधात दडलेली असतात. वारेमाप किंवा अनावश्यक खरेदी एवढेच नव्हे तर ज्यादा पैसे मोजून मर्जीतल्या कंत्राटदाराला फायदा करून देण्याकरीता वाटेल ते निर्णय घेतले जातात. आणि अखेरीस कंपनीचा तोटा वाढतो. ज्यातून थेट संपूर्ण कंपनीलाच लिलावात काढण्यापर्यंत त्याची मजल जाते. खरे तर देशाच्या ग्रामीण भागात किंवा निमशहरी भागात सर्वात चांगले आणि स्वस्त टेलिफोन सेवा देण्याचे काम बीएसएनएल करीत आले आहे. आता तर दूरसंचार प्राधिकरणाकडून कितीतरी नवे नियम तयार करून स्वस्तातले मोबाईल किंवा इंटरनेट सेवा देण्याची तयारी सुरु आहे. खाजगी कंपन्या त्यातही नफा कमावण्याचे प्रयत्न करतात. आणि त्याच्या अगदी विरुध्द सरकारी कंपनीला टाळे ठोकण्याची तयारी होताना दिसून येते. म्हणजे पंधरा वर्षापूर्वी दूरसंचार घोटाळा झाला होता तर आता भारत संचारला टाळा ठोकण्याचा विक्रम या सरकारने केला आहे असे म्हणावे लागते.